जा. क्र. मु. अ/औ. मं/डिबो/ 2720 /९९
औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
औरंगाबाद. दिनांक: 28.6.99

108

**विषय :- दि. २८.५.९९ रोजी झालेल्या बैठकीचा कार्यवृत्तांत.**

मा. मुख्य अधिकारी/औरंगाबाद मंडळ यांनी बोलविलेली दि. २८.५.९९ ची बैठक ठिक ११.३० वाजता मुख्य अधिकारी/औरंगाबाद मंडळ यांच्या दालनात सुरु होऊन त्यात पुढील अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

१. मा. मुख्य अधिकारी/औरंगाबाद मंडळ.
२. मुख्य लेखा अधिकारी/औरंगाबाद मंडळ.
३. मिळकत व्यवस्थापक/औरंगाबाद मंडळ.
४ मा. मुख्य अधिकारी यांचे स्विय सहाय्यक - १ व २/औ. मं.
५ उप अभियंता, उपविभाग क्र. १ श्री. एस. डी. पांडे.
६ उप अभियंता, उपविभाग क्र. २ श्री. के. एम. कोठारे.
७ उप अभियंता, उपविभाग क्र. ३ यांचे वतीने श्री. डी. डी. चिखे [शा अभियंता]
८ उपअभियंता, उपविभाग क्र. ४ श्री. एच. आर. पाठक.
९ उप अभियंता, उपविभाग क्र. ५ श्री. एस. बी. चिमकोडे.
१० सहाय्यक वास्तुतज्ञ /औरंगाबाद मंडळ.

सभा सुरु होतांना मा. मुख्य अधिकारी/औ. मं. यांनी सर्व उपअभियंता यांचेकडे असलेल्या विभागवार कामांची माहिती करुन घेतली. त्यात..

१] एस. डी. पांडे, उप अभियंता, उपविभाग क्र. १/औ. मं. यांच्या कामाची सविस्तर माहिती घेतली. श्री. पांडे यांचेकडे एकूण तीन कर्मचारी कार्यरत आहेत.
१] एस. ए. खान/शाखा अभियंता [२] के. ऐ. ऐकले /कनिष्ठ अभियंता आणि
३] एस. एम. वडेकर /तांत्रिक सहाय्यक यांचा समावेश आहे.

उप अभियंता-१/औ. मं. यांचेकडे कोणकोणती नविन कामे आहेत व कोण-कोणती जुनी कामे आहेत याची माहिती मा. मुख्य अधिकारी/औ. मं. यांनी विचारली. त्याप्रमाणे उप अभियंता-१ यांनी माहिती दिली की, ४८ गाळे मध्यम उ. गट, गृहनिर्माण भवनाजवळ, तसेच ५४० गाळे पैकी ५१२ गाळे अल्प उ. गट तिसगांव औरंगाबाद येथे सुरु आहेत. तसेच १४६ गाळे पैकी ३८ गाळे मध्यम उ. गट तिसगांव, ४८ गाळे मध्यम उ गट, गृहनिर्माण भवनाचा अतिरिक्त मजला व १४ + ४ दुकाने देवगिरी कॉलिज जवळ, औरंगाबाद या प्रस्तावित योजनांचा समावेश आहे.

जमिन : कांचनवाडी, वाळूज व पैठण एम. आय. डी. सी. परिसरातील जमिन व नियोजित योजना व इतर अनुषांगिक कामे उप अभियंता-१/औ. मं. यांचेकडे आहेत. वाळूज, कांचनवाडी व पैठण जमिनीबद्दल सविस्तर चर्चा केली. मा. मुअ/औमं. यांनी " लँड बँक " बनविण्यावर जास्त भर दिला. व याबाबत संबंधित कार्यालयाकडे पाठपुरावा करण्याबाबत सुचना दिल्या.

..२..

<u>जुन्या वसाहतींची देखभाल</u> :- गृहनिर्माण भवनाजवळील १९२ गाळे, ३२ गाळे, १६ गाळे व २४ गाळे उच्च उ. गट, १६४ गाळे अल्प उ गट. रोशनगेट, औरंगाबाद येथील गाळयांची /वसाहतींची देखभाल उप अभियंता-१/औ. मं. यांचेकडे असल्याचे त्यांनी मा. मुअ/औमं. यांना सांगितले.

२] <u>के. एम. कोठारे, उप अभियंता, उपविभाग क्र. २ :</u>

उप अभियंता, उपविभाग क्र. २ यांनी आपल्याकडील सर्व कामांची सविस्तर माहिती मा. मुअ/औ मं. यांना दिली त्यांनी सांगितले की, त्यांच्याकडे एकूण ४ कर्मचारी कार्यरत आहेत. त्यात...

१] एम. एम. खान, /शाखा अभियंता. [२] पी एन. वाबळे /कनिष्ठ अभियंता ३] एल. एच. जगताप/कारकून व [४] आर. बी. दशरथ /क. सहाय्यक यांचा समावेश आहेत.

सध्या उप विभाग क्र. २ यांचेकडे नविन कामापैकी ३३६ गाळे अल्प उ. गट मुकूंदवाडी, औरंगाबाद येथील काम चालू असून त्याचे ठेकेदार मे. व्ही. टी. पाटील हे आहेत. कामाची अंदाजित किंमत रू. २. ५१ कोटी आहे. तसेच १७२ गाळे मध्यम उ. गट ही प्रस्तावित योजना आहे. सध्या ह्या योजनेचे टेंडर प्रोसेसिंग चालू आहे. १७२ गाळे मउगट ह्या योजनेचा टेंडर प्रोसेसिंग प्रस्ताव प्राधिकरणाकडे पाठविलेला आहे.

<u>जमिन</u> :- उप अभियंता-२ यांनी त्यांच्याकडे औरंगाबाद पासून जवळच असलेल्या बिड बायपास रोडलगत देवळाई गांव असून तेथील जमिन गृहनिर्माण योजनेस चांगली असल्याचे सांगितले. तेथं पर्यंत प्लॉटींग झालेली आहे. लगतच सातारा परिसरही असल्यामुळे ही योजना/जमिन गृहनिर्माण योजना राबविण्यासाठी योग्य असल्याचे मत उप अभियंता-२ यांनी व्यक्त केले.

तसेच गारखेडा येथील सर्वे क्र. १८/१/१, १८/ब/३ व २/२ या जमिनीचे प्रकरण जमिनीही त्यांच्या अधिपत्याखाली येते असे सांगितले. तसेच सदरील जमिनीचे प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याचे त्यांनी सांगितले. त्यावर मुअ/औमं. यांनी याबाबत सरकारी वकीलाकडे पाठपुरावा करावा असे अशा सुचना दिल्या

<u>जुन्या इमारतींची देखभाल</u> : आर-२६, २७, २८, २९ व आर-४३, सिडको-एन-७, ९ औरंगाबाद येथील जुन्या वसाहतींची देखभाल. त्यात ११२ गाळे, २१२ गाळे व २१९ गाळे अल्प उ. गट व ६८ गाळे, ८८ गाळे मध्यम उ. गट, ७२ गाळे, २६ गाळे, व ५० गाळे उच्च उत्पन्न गट यांचा समावेश आहे. तसेच मंडळाने बांधून पुर्ण केलेले ६ गाळे म. उ. गट हेही उअ-२ /औमं. यांचेकडे येतात. सदरील गाळयांबाबत मा. मुअ/औमं. यांनी सविस्तर माहिती विचारली की, ६ गाळे रिक्त का आहेत. त्याची जाहिरात दिलेली आहे कि नाही, त्यावर उत्तर देतांना मिव्य/औम. यांनी असे सांगितले की, जाहिरात दिली होती. त्यास अनुसरून अर्ज प्राप्त झालेले होते. परंतु नंतर किंमत वाढली.

किंमत वाढल्यानंतर सुरुवातीला २/३ अर्जदारांनी पैसे परत घेतले. सर्वांना किंमत वाढीची कल्पना देण्यात आली होती. परिणामी सर्वच लोकांनी पैसे नंतर पैसे परत घेतले. त्यामुळे सदरील गाळे सर्वसामान्यांना वितरित न करता ते पोलिस विभागाला देण्याबाबत प्रस्ताव आला. जुन्या किंमतीत सर्व गाळे विकत घेण्यास पोलिस विभागाने संमती दर्शविली. परंतु नंतरच्या काळात पुन्हा किंमत वाढली. ती त्यांना कळविण्यात आली. परंतु त्यांच्याकडून अद्याप होकार आलेला नाही. यावर तातडीने तोडगा काढून गाळयांचे हस्तांतरण पोलिस विभागाला त्वरीत व्हेइल असे मिव्य/औमं. यांनी पहावे अशी सुचना मा.मुअ/औमं. यांनी केली. सदरील प्रकरणात गाळेधारकांकडून कोर्टबाजी होण्याची भिती मा.मुअ/औमं. यांनी व्यक्त केली. परंतु सर्वांनीच पैसे परत घेतल्यामुळे तसे काही होणार नाही असे मिव्य/औमं. यांनी सांगितले.

तसेच उप अभि-२/औमं. यांचेकडे ८२ गाळे उ.उ. गट, मुकुंदवाडी, औरंगाबाद तसेच ४४४ गाळे बिडी कामगार, गारखेडा औरंगाबाद ह्या जुन्या वसाहतींची देखभाल त्यांच्याकडे असल्याचे सांगितले

३] <u>उप अभियंता, उपविभाग क्र. ३ :- श्री. यु. एन. तम्मेवार.</u>

यु. एन. तम्मेवार यांचेकडे कार्यकारी अभियंता या पदाचा अतिरिक्त कार्यभार असल्यामुळे ते कार्यालयीन कामासाठी म्हाडाच्या मुंबई येथील मुख्यालयात गेले होते. तरी त्यांच्या अधिपत्याखालील शाखा अभियंता श्री. डी. डी. चिखले यांनी उपविभाग क्र.३ ची माहिती दिली. त्यांच्याकडे २ अभियंते व एक तांत्रिक सहाय्यक असल्याचे सांगितले. त्यात

१] डी. डी. चिखले/शाखा अभियंता. [२] एस. बी. साळुंखे/क. अभियंता व ३] एस. एन. हेमाद्रे/तांत्रिक सहाय्यक यांचा समावेश आहे. चिखले यांनी सांगितले की, उपविभाग-३ कडे ६८८ गाळे [अ.उ.ग] पैकी ३४५ गाळयांची योजना सुरु आहेत. सदरील कामाचे ठेकेदार मे. लक्ष्मी कन्स्ट्रक्शन औरंगाबाद हे आहेत. सध्या काम प्रगति पथावर असल्याचे सांगितले. ६८८ पैकी ३४३ उर्वरित गाळयांची सध्या जाहिरात चालू असून त्याची शेवटची तारीख १६.६.९९ असल्याचे सांगितले.

सक्र. २७, शहानुरवाडी, औरंगाबाद येथील १०० गाळे म.उ.ग. व ५० गाळे उ उ गट तसेच सक्र. ४५ शहानुरवाडी, औरंगाबाद येथे ६ गाळे+ ७ दुकाने व १ व्यापारी भूखंड इ. कामे प्रस्तावित असल्याचे सांगितले.

<u>जमिनी</u> : जमिनी बाबत मा.मुअ/औमं. यांनी विचारले असता उपअभियंता-३ यांचेकडे एकही जमिनीचा प्रस्ताव नाही असे सांगितले.

<u>जुन्या इमारतींची देखभाल</u> : एन-५, सिडको येथील ९३ गाळे मउगट, १५२ गाळे मउगट, ३८ भूखंड मउ.गट. तसेच एन-६, सिडको येथील १९० गाळे अत्यल्प उ.गट, ३३६ गाळे अल्प उगट व ५७ गाळे म उ गट. [भाग-१] यांचा समावेश आहे तर भाग-२ मध्ये ३० गाळे मउगट, १३१ गाळे अ.उ गट, १५० विकसित भूखंड व ८२ + ४ =८६ गाळे उ उ.गट तसेच १५० गाळे अ.उ गट, शहानुरवाडी, एकनाथनगर येथील

२०० गाळे, ५० गाळे, ९६ गाळे व १०० गाळे ही सर्वात जुनी योजना यांचा समावेश आहे. तसेच ४८ गाळे,३६ गाळे, २० गाळे व १२ जोडबंगले पीरबजार औरंगाबाद येथील योजनांचाही समावेश आहे. शिवाय हर्सुल येथे मंडळाने २२८ गाळे सफाई कामगार यांचेसाठी बांधलेले आहेत. ती सर्व गाळे मनपा/औरंगाबाद च्या कर्मचा-यांना वितरीत केलेली आहेत.

४] उप अभियंता,उपविभाग क्र.४ :- एच.आर.पाठक.

उप अभियंता-४ यांनी मा.मुअ/औमं. यांना असे सांगितले की, उपविभागात एकूण ४ कर्मचारी कार्यरत आहेत. त्यात..

१] के.बी.राणे, शाखा अभियंता[जालना] [२] के.व्ही.पटेल,शाखा अभियंता-परभणी [३] एच.एन.दिनकर,शाखा अभियंता[नांदेड] आणि ४] डी.बी.लांबतुरे/तांत्रिक सहाय्यक यांचा समावेश आहे. त्यात त्यांनी सुरूवातीलाच असेही सांगितले की, त्यांच्याकडे जालना/परभणी/नांदेड आणि आताचा नविन हिंगोली जिल्हयाचा समावेश आहे.

श्री.राणे हे जालना येथील कामे बघतात. तेथे नविन कोणतीच कामे नाहीत. तर श्री.पटेल हे परभणी येथील कामे बघतात. परभणी येथील सक्र.५२७[भाग] या जमिनीवर १५ गाळे मउगट व २५ गाळे अउगट अशी कामे चालू आहे तर श्री.दिनकर हे नांदेड येथे कार्यरत असून तेथे ६० गाळ्यांची योजना पुर्ण झाली व सध्या १५३ गाळे अल्प उ.गटाचे रु.१.१० कोटीचे काम प्रगति पथावर आहे. तसेच नांदेड येथेच एक तांत्रिक सहाय्यक श्री.लांबतुरे हे कार्यरत आहेत.

मा.मुअ/औमं.यांनी सांगितले की, मुदखेड/नपा. जमिन देण्यास तयार आहे. तेथे आपण स्वत: जावून नगराध्यक्ष/मुदखेड यांना भेटावे अशी सुचना ~~केली~~ उअ-४ यांना केली. तसेच औंढा, येथील तहसिलमध्ये जावून श्री.चौधरी यांना भेटणे अशाही सुचना दिल्यात. मा मुअ/औमं यांनी जास्तीत जास्त जमिनी मिळविण्यासाठी प्रयत्न करण्याचे सुचविले. आपल्याला सर्वात जास्त महत्वाची " लँड बँक " आपल्या ताब्यात असणे आवश्यक असल्याचे सांगितले.

शेवटी उअ-४/औमं.यांनी त्यांना १ क्लार्क मिळावा अशी विनंती केली. मा.मुअ/औमं.यांनी सांगितले की, यापुर्वी कशी कामे करून घेत होता. सध्याही त्याचप्रमाणे करावीत. आपल्याला नविन भरती करता येत नाही. भरतीचे नियम ~~सर्वांना~~ सर्वांना माहित आहे.तेव्हा ते शक्य नाही . पण तरीही कामाचे विभाजन करून तुम्हाला एखादा क्लार्क देण्याचे अश्वासन दिले.

५] उप अभियंता,उपविभाग क्र.५ :- श्री.एस.बी.चिमकोड.

उअ,उवि-५/औमं.यांनी सुरूवातीलाच सांगितले की, माझ्याकडे दोनच कर्मचारी कार्यरत आहेत. पैकी त्यात..

१] आर.एम.बिरादार/शाखा अभियंता[उदगिर-लातूर] [२] एम.एन.खान शाखा अभियंता[गेवराई-बीड] येथे कार्यरत आहेत. उप अभियंता-५ यांनी

सुरुवातीलाच एका तांत्रिक सहाय्यकाची मागणी मा.मुअ/औमं. यांचेकडे केली. त्यावर मा.मुअ/औमं. यांनी आपल्याकडे एकूण किती तांत्रिक सहाय्यक आहेत व ते कोठेकोठे कामे करतात असा प्रश्न केला. तेव्हा त्यांना माहिती देण्यात आली की, उअभियंता-१ उपअभियंता-२, उपअभियंता-३ व उपअभियंता४यांच्याकडे प्रत्येकी एक तांत्रिक सहाय्यक कार्यरत आहेत. परंतु उपअभियंता-५ यांचेकडे तांत्रिक सहाय्यक नाही. आणि नविन कामावर तांत्रिक सहाय्यकाची आवश्यकता आहे. मंडळात सध्या एकूण ६ तांत्रिक सहाय्यक कार्यरत असून उर्वरित २ तांत्रिक सहाय्यकापैकी व्ही.डी.जोशी हे मा.सभापती/औमं. यांचेकडे स्विय सहाय्यक म्हणून काम पहातात तर डी.एच.शेख हे मिव्य/औमं. यांचेकडे भाडेवसुलीकार म्हणून काम करतात. उअ-२ यांचेकडे तांत्रिक सहाय्यकाऐवजी कारकुन [तांत्रिक] काम करतात.

उअ-५/औमं. यांनी एका तांत्रिक सहाय्यकाची मागणी केल्यानंतर मा.मुअ/औमं. यांनी वरील परिस्थितीचा आढावा घेतल्यानंतर एक तांत्रिक सहाय्यक उअ-५/औमं. यांना देता येईल का? याची पडताळणी करुन पाहून निर्णय घेऊ असे सांगितले. तत्पुर्वी, उप अभियंता-५ यांनी त्यांच्याकडे असलेल्या नविन कामांची माहिती मा.मुअ/औमं. यांना करुन दिली. त्यात लातूर जिल्ह्यात उदगीर येथे ८० अत्यल्प उ.गट व ८ अल्प उ.गट गाळ्यांची योजना चालू असून त्याचे ठेकेदार मे.शिवानी कन्स्ट्रक्शन हे आहेत. तर रोवराई येथेही ८८ गाळे अत्यल्प उ.गट व २६ गाळे अ.उ.गटाची कामे चालू आहे. त्याचे ठेकेदार मे.एस.चंद्रपाल , हे आहेत.

उपअभियंता-५ यांचेकडे बीड, उस्मानाबाद व लातूर या जिल्ह्यांचा समावेश असल्याचे सांगितले. उस्मानाबाद व लातूर येथे नविन कामे नाहीत. बीड येथे मंडळाने पुरग्रस्तांसाठी काही गाळे बांधलेले आहेत.

जुन्या वसाहतींची देखभाल : लातूर येथील बाभळगांवरोड येथे मंडळाने गाळे बांधलेले आहेत. तेथील गाळ्यांची व जमिनिची देखभाल तसेच भुकंप पुनर्वसनाची कामे ही उप-अभियंता-५ यांचेकडे येतात.

सर्वात शेवटी मा.मुअ/औमं. यांनी सर्व उपस्थित उप अभियंता यांना भूसंपादनावर जास्त लक्ष केंद्रीत करण्यास सांगितले. आपल्याला "लँड बँक " तयार करावयाची असल्याचे त्यांनी नमुद केले. जमिनी आपल्या ताब्यात असणे/घेणे जरुरीचे असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले. ज्याज्या उपअभियंता यांच्या अखत्यारीत नविन तालुके/जिल्हे झाले असतील तेथे त्यांनी जमिनी घेण्यावर भर द्यावा. त्यासाठी संबंधित नपा/तहसिल/उपविभागीय अधिकारी/जिल्हाधिकारी यांना वेळोवेळी भेटत रहावे असे सांगितले.

मंडळाचे मुख्य लेखा अधिकारी श्री.सी.पी.पगारे, यांनी मा.मुख्य अधिकारी/औरंगाबाद मंडळ यांना दोन स्विय सहाय्यक [ टेक्नीकल ] असल्याचे सांगून त्यांची

ओळखही करुन देण्यात आली. त्यात..

१] आर. के. पाटील, स्थिय सहाय्यक तथा उप अभियंता-१ व [२] डी. एन. डेकाटे, स्थिय सहाय्यक तथा उप अभियंता-२/औ. मं. यांचा समावेश असल्याचे सांगितले. पैकी, श्री. पाटील उप अभियंता यांचे अधिपत्याखाली दोन अभियंते कार्यरत आहेत. १] श्री. ए. एस. कुलकर्णी/शाखा अभियंता व [२] एस. झेड. हुसेन/शाखा अभियंता यांचा समावेश आहे. तर श्री. डेकाटे यांचेकडेही दोन शाखा अभियंते कार्यरत असून त्यात १] श्री. एस. जी. कुलकर्णी/शाखा अभियंता २] श्री. आर. एस. गोराडे/क. अभियंता यांचा समावेश आहे. अशी माहिती मा. मुअ/औ. मंडळ यांना देण्यात आली

मा मुअ/औमं. यांनी सर्व उप अभियंता यांना सुचना दिल्यात की, त्यांनी प्रत्येक सोमवारी भूसंपादनासंबंधी केलेल्या पाठपुराव्याची माहिती मा. मुख्य अधिकारी/औरंगाबाद मंडळ यांना द्यावी. तथापि, सोमवारी कार्यालयीन सुटी आल्यास पुढच्या दिवशी म्हणजेच मंगळवारी सदर माहिती प्रत्यक्ष भेटून सादर करावी.

शेवटी १.४५ वाजता सभा संपल्याचे मा. मु. अ/औमं. यांनी जाहिर केले व सभा संपली.

मुख्य प्रतिवर मु. अ.
~~यांची स्वाक्षरी आहे.~~

[signature]

मुख्य अधिकारी,
औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
औरंगाबाद. करीता

प्रत कार्यवाहीस्तव.
: कार्यकारी अभियंता औरंगाबाद मंडळ/मुख्य लेखा अधिकारी औरंगाबाद मंडळ.
प्रत उपअभियंता उपविभाग क्र. १, २, ३, ४, ५
प्रत उपअभियंता चित्रशाखा १, २,
प्रत मिळकत व्यवस्थापक औरंगाबाद मंडळ.
प्रत सहाय्यक वास्तुतज्ञ औरंगाबाद मंडळ.

प/